# Assignment

## B.A. III Sem - V

## Population Geography

2024-25

# Vivekanand College, Kolhapur

# (Empowered Autonomous)

Department of Geography

Date: 16/08/2024

## Notice

All the students of B.A. III (Geography) are hereby informed that, department of Geography will going to conduct Assignment on Population Geography from 17 to 28 August 2024. Assignment is compulsory to all students.

(Dr. G. S. Ubale)
Head
DEPARTMENT OF GEOGRAPHY
VIVEKANAND COLLEGE.
KOLHAPUR.

VIVEKANAND COLLEGE ESTD. JUNE 1964 KOLHAPUR-416 003

23/07/2024

# Geography
## B.A. III
## Population Geography
## Assignments

| | |
|---|---|
| 1) Sanika Balu Mane | S.B.MANE |
| 2) Sulekha Ashok lakhe | S.A.lakhe |
| 3) Pragati Prabhakar Bhekane. | PBhekane. |
| 4) Megha Prakash Rathod | MRathod |
| 5) Sanika Yuvaraj Malavi | Smalavi. |
| 6) Sanika Vijay Jadhav | SVJadhav |
| 7) Mansi vilas Dinde | [illegible] |
| 8) Shravani Santosh Chougule | [illegible] |
| 9) Harshada Hanmant Patil | HPatil. |
| 10) Rudra Prabhaavale | [illegible] |
| 11) Rizvaj firoj Pakhali | Rizvaj. |
| 12) Ajay Sanjay Atigre | ASA |

VIVEKANAND COLLEGE
ESTD. JUNE 1964
KOLHAPUR-416 003

Scanned with OKEN Scanner

Name - Ajay Sanjay Atigre

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

54608

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Signature of Supervisor | |

Suppliment No. :

Roll No. :

Class : BA - TY

Subject :

Test / Tutorial No. :

Div. :

★ लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

प्रस्तावना :-

भूतलावर लोकसंख्येची विभागणी सारखी नाही. ती अत्यंत विषम स्वरुपाची आहे. सामान्यत: पृथ्वीवरील 50% भाग हा मानवविरहित आहे 25% भाग खूपच विरळ लोक वस्तीचा, तर 25% भाग अतिशय दाट वस्ती असलेला आहे. निरनिराळ्या खंड व देशाचा विचार करता तेथेही लोकसंख्या सारखी आढळत नाही या प्रकारे जगात लोकसंख्येचे वितरण समसमान नाही याचे कारण म्हणजे लोकसंख्येच्या वितरणावर निरनिराळ्या घटकांचा परिणाम झालेला आहे. जेथे परिस्थिती अनुकूल आहे, तेथे लोकसंख्या अधिक व जेथे प्रतिकूल आहे तेथे लोकसंख्या कमी आढळते.

★ लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

लोकसंख्या वितरणावर भौगोलिक, आर्थिक, प्राकृतिक, धार्मिक, राजकीय व सामाजिक घटकांचा परिणाम होतो.

1) भौगोलिक घटक :-

भौगोलिक घटकांमध्ये खालील घटकांचा समावेश होतो.

अ) भुरचना -

भुरचना किंवा प्राकृतिक रचनाचा वितरणावर मोठा परिणाम होतो त्यातील काही भुरचना पुढील प्रमाणे.

i) पर्वत :-

पर्वतीय प्रदेशाची भुरचना अतिशय ओबडधोबड असते. तेथील जास्त उंची, तीव्र उताराचे भाग, खडकाळ जमिन, जंगले व प्रदेशाची दुर्गमता यामुळे पर्वतीय प्रदेशात शेती, उद्योगधंदे, व वाहतुकीची विकास झालेला नसतो. त्यामुळे पर्वतीय प्रदेशात लोकसंख्या खूप कमी असते. उदा - हिमालय

Scanned with OKEN Scanner

ii) पठार :-

पठारी प्रदेशही मानवी जीवनास अनुकूल असतात, काही भागामध्ये सुपीक जमीन असल्यामुळे शेती व उद्योगधंद्याचा विकास झालेला असतो. भारतातील दख्खनचे पठार व अमेरिकेतील कोलंबियाचे पठारावर लोकवस्ती आढळते.

iii) मैदाने -

पर्वत व पठारापेक्षा मैदानी प्रदेशात जास्त लोकवस्ती आढळते कारण अन्नधान्याचे उत्पादन व सपाट भागामुळे परिस्थिती अनुकूल असते. मैदानी प्रदेश पाहता प्राचीन संस्कृतीचा विकास झालेला दिसून येतो. उदा - भारतीय, चीन व इजिप्शीयन संस्कृती.

iv) समुद्रकिनारे -

समुद्रकिनाऱ्याचे मानवीदृष्ट्या खूप महत्व आहे. किनाऱ्याजवळ भात व नारळाचे उत्पादन होते आणि मासेमारी चालते, शिवाय किनाऱ्यावर दंतुर असल्यास बंदराचा विकास होऊन व्यापाराची प्रगती होते. त्यामुळे येथे लोकवस्ती दाट आढळते.

v) प्रदेशाची उंची :-

कमी उंचीच्या भागात हवामान मानवी वस्तीस अनुकूल आहे. त्यामुळे मैदानी प्रदेशात जास्त लोकवस्ती आढळते. याउलट जास्त उंचीच्या भागात मानवी वस्त्या नसतात प्रतिकूल हवामान व प्राणवायू साठा कमी प्रमाणात आढळतो, विकासाच्या सुविधा नसतात/पुरवता येत नाहीत. यामुळे उंचीच्या ठिकाणी वस्त्या ~~विरळ~~/आढळत नाहीत.

ब) पाणीपुरवठा -

मानवी जीवनात पाण्याचे अत्यंत महत्वाचे स्थान आहे. मानवास पाणी लागते, तसेच शेती व उद्योग धंद्यासाठी सुद्धा पाणी लागते. यामुळे मनुष्य पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी वस्ती केंद्रीत करतो. म्हणूनच नद्यांच्या खोऱ्यात आपल्याला दाट लोकवस्ती आढळते. उदा :- गंगा, मिसीसिपी नदी इ.

क) हवामान -

हवामान ज्याठिकाणी अनुकूल असते तेथे लोकवस्तीचे प्रमाण जास्त असते. तर जेथे हवामान प्रतिकूल असते तेथे लोकवस्ती विरळ, कमी आढळते. कारण प्रतिकुल हवामानात मानवी आजार जास्त उद्भवतात त्यामुळे आपल्याला दुषित हवामानात लोकसंख्या विरळ आढळते.

Scanned with OKEN Scanner

ड) मृदा -

मृदा हा लोकवस्तीसाठी एक महत्वाचा घटक आहे कारण जेथे सुपीक मृदा आढळते तेथे शेती केली जाते व त्यामुळे तेथे लोकवस्ती जास्त आढळते.

इ) खनिजे व ऊर्जासाधने :-

जिथे खनिजे व ऊर्जासाधने आढळतात तेथे उद्योगधंद्याचा विकास झालेला दिसून येतो व त्यामुळे तिथे लोकवस्ती आढळते उदा:- भारतातील झारखंड, पं.बंगाल, जर्मनीतील रूर व रशियातील डोनेट्स इ. प्रदेश.

फ) नैसर्गिक वनस्पती [जंगले]:-

जंगलाने व्यापलेल्या प्रदेशात मानवी वस्त्या ज्या असतात त्या अत्यंत विरळ असतात त्यामुळे जंगल व्याप्त प्रदेशात लोकसंख्या खुपच कमी असते.

ई) आर्थिक घटक -

लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणाऱ्या आर्थिक घटकांचा खालील घटकांचा समावेश होतो.

अ) वाहतुकीची साधने -

कोणत्याही प्रदेशात वाहतुकीच्या साधनांना महत्व असते वाहतुकीच्या मार्गाने एका भागातून दुसऱ्या भागात जाणे सुलभ होते त्यामुळे लोकांना निरनिराळ्या ठिकाणी पोहचणे शक्य होते. व्यापाराच्या सुविधा पुरवता येतात, विकासाच्या दृष्टीने वाहतूक हा एक महत्वाचा घटक आहे. वाहतुकीच्या साधनांमुळेही लोकसंख्या वाढीवर परिणाम होतो.

ब) खनिजे व ऊर्जा साधनांचे उत्खनन -

खनिजे व ऊर्जासाधने महत्वाची असतात, काही भागात केवळ खनिजे व ऊर्जासाधने महत्वाची नसतात. तर कारण तेथील भागात उत्खनन व ऊर्जेची साधने उपलब्ध नसतात. खनिजे ही मुख्यत उद्योगधंद्याना, व खाणकाम क्षेत्र, व कारखाने etc. यांना उपयुक्त असतात. तर ऊर्जेचीसाधनेही मुख्यत ऊर्जा केंद्रांना उपयुक्त असून त्याचबरोबर त्या प्रत्येक ऊर्जेचा उपयोग मानवी वस्तीसाठी ही उपयुक्त असतो. परंतु उत्खनन क्षेत्रात लोकवस्ती विरळ आढळते परंतु उत्खनन क्षेत्रापासून 30, 40 km अंतरावरील शहर, गाव, खेडे आपल्याला विकसित दिसून येतील.

क) औद्योगिक विकास -
जेथे निरनिराळ्या उद्योगाचा विकास होता तिथे रोजगार निर्माण होतो त्यामुळे निरनिराळ्या भागातील लोक औद्योगिक क्षेत्रात जाऊन राहतात. म्हणून तिथे लोकसंख्या दाट असते.

इ) जलसिंचनाची साधने -
जलसिंचनाच्या साधनात धरणे, कालवे, तलाव प्रमुख आहेत जिथे साधनांची प्रगती होते तेथे शेतीचा विकास होतो व अन्नधान्याच्या उत्पादनात वाढ होते. या औद्योगिक उद्योगधंद्याचा विकास होतो. व लोकसंख्या वाढते.

ई) नागरीकरण -
शहरे ही वाहतुकीच्या मार्गाची केंद्र असतात अशा ठिकाणी उद्योगधंदे व व्यापाराची प्रगती होते त्यामुळे लोकांना रोजगार मिळतो शहरात शिक्षण, आरोग्य, मनोरंजन इ. सोयी असतात. यामुळे लोक ग्रामीण भागातून शहरी भागात जाऊन राहतात अशा प्रकारे लोकांचे शहरामध्ये स्थलांतर होऊ लागते म्हणजे शहरीकरणात नागरीकरण वाढू लागते.

उ) धार्मिक, राजकीय आणि सामाजिक घटक -
धार्मिक, राजकीय व सामाजिक घटकांचेही लोकसंख्येच्या वितरणावर कमी अधिक प्रमाणात परिणाम होतो उदा - धार्मिक दृष्ट्या स्वतःचे वर्चस्व सिद्ध करण्यासाठी प्रत्येक धर्मात स्पर्धा लागते यामुळेही लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम होतो व धार्मिक दृष्ट्या समान स्वतःचे समाज तयार करून लोकसंख्येचे वितरण करतो काही
काही वेळा राजकीय घटकांचेही परिणाम लोकसंख्येवर होतात उदा - पुरग्रस्त, आपत्तीग्रस्त, भूकंपग्रस्त किंवा काही राजकीय अडचणी सुध्दा लोकसंख्येच्या वितरणावर प्रभाव पाडतात. सामाजिक दृष्ट्या सामाजिक बंधने, कुटुंब पध्दत, सामाजिक रुढी, परंपरा, यांचाही लोकसंख्येवर परिणाम होते.

Scanned with OKEN Scanner

नाव : रियाज फिरोज पखाली.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

55091

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

Signature of Supervisor

Suppliment No. :

Subject :

Roll No. :

Test / Tutorial No. :

Class : BA II

Div. :

प्रश्न : लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

प्रस्तावना :-

भूतलावर लोकसंख्येची विभागणी सर्वत्र सारखी नाही. ती अत्यंत विषम स्वरूपाची आहे. सामान्यत: पृथ्वीचा 90% भाग मानवविरहीत आहे. 25% भाग खुपच विरळ लोकवस्तीचा, तर 25% भाग खुप दाट वस्ती असलेली आहे. निरनिराळे खंड व देशांचा विचार करता तेथेही लोकसंख्येची विभागणी सारखी आढळत नाही. या प्रकारे जगात लोकसंख्येची ~~विभागणी~~ वितरण समसमान नाही, याचे कारण म्हणजे लोकसंख्येच्या वितरणावर निरनिराळ्या घटकांचा परिणाम झालेला आहे. जेथे परिस्थिती अनुकूल आहे, तेथे लोकसंख्या अधिक आणि परिस्थिती प्रतिकूल आहे तेथे लोकसंख्या कमी आढळते.

• लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक, आर्थिक, धार्मिक, राजकीय तसेच सामाजिक घटकांचा परिणाम होतो.

1) भौगोलिक घटक (प्राकृतिक घटक) :

कोणत्याही प्रदेशातील लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक घटकांचा प्रभाव पडतो. यात भूरचना, पाणी

पुरवठा, हवामान, जमिन व खनिजसंपत्ती या भौगोलिक घटकांचा समावेश होतो.

अ) भूरचना (प्राकृतिक रचना -(Relief):-
भूरचना किंवा प्राकृतिक रचनेचा लोकसंख्येच्या वितरणावर मोठा परिणाम होतो. पृथ्वीची भूरचना सर्वत्र समान नाही. पृथ्वीचा काही भाग मैदानी आहे. या भूरचनेचा लोकसंख्येच्या, वितरणावर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम झालेला आहे.

i) पर्वत :-(Mountains)
पर्वतीय प्रदेशांची भूरचना अतिशय ओबडधोबड असते. येथील परिणाम हेत जास्त उंची, तीव्र उताराचे भाग. खडकाळ जमीन, जंगले व प्रदेशाची दुर्गमता यामुळे पर्वतीय प्रदेशांत शेती, उद्योगधंदे व वाहतुकीचा विकास झालेला नसतो. त्यामुळे पर्वतीय प्रदेशात लोकसंख्या खुप कमी असते. उदा. हिमालय, रॉकी, अँडीज इत्यादी पर्वतीय प्रदेश पर्वतीय प्रदेश मानवी वस्ती आढळते. अशा पर्वतीय प्रदेशांत खनिजे सापडत असल्याने येथे थोडा आर्थिक विकास झालेला आहे. भारतातील आसामच्या पर्वतीय प्रदेशात खनिजतेल, तर उत्तर अमेरीकेतील ॲपलेशियन पर्वतीय प्रदेशात दगडी कोळसा सापडतो.

ii) पठार (Plateaus) :-
पठारी प्रदेशात मानवी जीवनास अनुकूल नसतात, पठारी प्रदेश दुर्गम असतात. या भागाचा इतर भागाशी फारसा संबंध नसतो त्यामुळे पठारावर लोकसंख्या कमी असते. उदा. तिबेटचे पठार.
मात्र काही पठारावरील सुपीक जमिनिमुळे तेथे शेती व उद्योगधंद्यांचा विकास झालेला आहे. उदा. भारताचे दख्खनचे पठार व उत्तर अमेरिकेतील कोलंबियाचे पठार. काही पठारावर खनिजे सापडतात.

iii) मैदान (Plains) :-

पर्वतीय व पठारी प्रदेशाच्या मानाने मैदानी प्रदेशात जास्त लोकसंख्या आढळते. मैदानी प्रदेशात सुपीक जमिनीमुळे अन्नधान्याचे व इतर कृषीमालाचे उत्पादन होतात कृषी कच्च्यामालामुळे मैदानी प्रदेशात उद्योगधंद्यांचा विकास होतो. सपाट प्रदेशामुळे येथे पक्के रस्ते व रेल्वे मार्गांची प्रगती होत असल्याने व्यापारी प्रगती होते. उदा. उत्तर भारताचे मैदान, संयुक्त संस्थानातील किनारवर्ती मैदाने चीनच्या पूर्वेकडील किनारी मैदाने इत्यादी मैदानी प्रदेशांचे महत्त्व पाहता प्राचीन संस्कृत्यांचा मैदानी प्रदेशात विकास झालेला आढळतो. उदा. भारतीय, चिनी व इजिप्तशीयन संस्कृत्या. परंतु काही मैदाने लोकवस्तीस प्रतिकूल असल्याने येथे अत्यंत कमी लोकसंख्या आढळते.

iv) समुद्र किनारे (sea coasts) :-

समुद्र किनाऱ्याला मानवदृष्ट्या खूप महत्त्व आहे. किनाऱ्याजवळ थोडी शेती होते. तेथे भात व नारळाचे उत्पादन होते किनाऱ्याजवळ मासेमारी चालते. शिवाय किनारा दंतूर असल्याने तेथे बंदराचा विकास होऊन व्यापाराची प्रगती होते किनाऱ्याचे महत्त्व पाहता जगातील मोठी शहरे किनाऱ्याजवळ स्थापन झालेली आहेत. त्यामुळे किनाऱ्याजवळ लोकसंख्येची घनता जास्त आढळते.

v) प्रदेशाची उंची (Altitude) :-

प्रदेशाच्या उंचीचाही लोकसंख्येवर प्रभाव पडतो. कमी उंचीच्या भागात हवामान मानवी जीवनास अनुकूल असते. त्यामुळे मैदानी प्रदेशात लोकवस्ती जास्त असते. येथे लोकसंख्येची घनता जास्त आढळते. याउलट जास्त उंचीच्या भागात थंड हवामानामुळे लोकवस्ती विरळ असते अतिउंचीच्या भागात वर मानवी वस्त्या नसतात. प्रतिकूल हवामानाबरोबर येथे प्राणवायू अतिशय विरळ नसतात
प्रतिकूल हवामानाबरोबर येथे प्राणवायू अतिशय विरळ

असतो. याचाही परिणाम लोकवस्तीवर होतो म्हणून हिमालय व जगातील इतर पर्वतीय क्षेत्रात जास्त उंचीवर वस्ती आढळत नाही.

ब) पाणीपुरवठा (Supply of water):
पाण्याचा लोकसंख्येच्या विभागणीवर फार परिणाम होतो. मानवी जीवनात पाण्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. माणसाला केवळ पिण्यासाठीच पाणी लागते असे नसून शेती - उद्योगामध्ये इत्यादीसाठीही पाणी लागते यासाठी मनुष्य पाणी उपलब्ध असलेल्या ठिकाणी वस्ती करून राहतो. नद्यांतून पाण्याचा मोठ्या प्रमाणात पुरवठा होतो. त्यामुळे नद्यांच्या खोऱ्यात दाट लोकवस्ती असते. या भागात लोकसंख्येची घनता खूप असते.
उदा. भारतातील गंगा, मिसिसिपी, चिनमधील यांगत्सिक्यांग इत्यादी नद्यांची खोऱ्यात लोकसंख्येची घनता जास्त आहे. पाण्याच्या उपलब्धतेचा परिणाम कोरड्या हवामानाच्या प्रदेशात स्पष्टपणे दिसून येतो. शुष्क प्रदेशात पाण्याचे दुर्भिक्ष्य असते. त्यामुळे शुष्क प्रदेशात लोकसंख्या अत्यंत कमी असते. शुष्क प्रदेशात लोकसंख्या अत्यंत कमी असते.

क) हवामान (Climate):
हवामानाचा लोकसंख्येच्या वितरणावर फार मोठा प्रभाव पडतो. जेथे आवश्यक तेवढे तापमान आणि पुरेसा पाऊस पडतो अशा अनुकूल हवामानाच्या प्रदेशात लोकवस्ती जास्त असते. येथे शेती, उद्योगामध्ये वाहतूक, व्यापार इत्यादींचा मोठा विकास होतो. त्यामुळे अशा प्रदेशात लोकसंख्या घनता असते. उदा. मान्सूनमारी मोसमी, चीनसदृश्य भूमध्यसागरी व पश्चिम युरोपीय हवामानाचे प्रदेश.

।। ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ।।
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

55093

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| Signature of Supervisor | |
|---|---|

Suppliment No. :
Roll No. :
Class :

Subject :
Test / Tutorial No. :
Div. :

प्रतिकूल हवामानाच्या प्रदेशात मात्र लोकवस्ती कमी असते. अशा भागात शेती, उद्योगधंदे, व्यापार इत्यादींचा विकास होत नाही. येथे उपजीविकेची साधने कमी असतात. त्यामुळे अशा भागात लोकसंख्येची घनता अत्यंत कमी असते. उदा. मोसमी . वाळवंटी व कुंड्रा हवामानाचे प्रदेश. वाळवंटी प्रदेशात भयंकर उष्णता व पाण्याची टंचाई यामुळे लोकसंख्या खुपच तुरळक असते. येथील व पाण्याची

3) मृदा (Soil) :-

मृदा किंवा जमीन हा देखील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारा एक प्रभावी घटक आहे. जमिनीवर शेतीची प्रगती अवलंबून असते. जेथे सुपिक जमीन असते तेथे शेतीचा विकास होतो. अशा प्रदेशात अन्नधान्य व इतर कृषी मालाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते नद्यांच्या खोऱ्यात गाळाची सुपिक जमीन असते. म्हणुन नद्यांच्या खोऱ्यात शेती आणि शेतीमालावर आधारीत उद्योगांचा विकास होतो. त्यामुळे नद्यांच्या खोऱ्यात लोकसंख्येची घनता जास्त असते. उदा. गंगा, सिंधु, यॉगत्सिकँग इत्यादी नदी खोरी.

Scanned with OKEN Scanner

५) खनिजे व ऊर्जा साधने :

अनिजे व ऊर्जा साधाने यांना खू महत्वा मोठे. अशुद्ध लोखंड, मॅगनधातू, बॉक्साईड, तांबे. इ. महत्त्वाची खनिजे असुन दगडी कोळसा, खनिज तेल ही महत्त्वाच ऊर्जासाधने आहेत. येथे खनिजे व ऊर्जा साधने विपुल प्रमाणात असतात तेथे खाणकाम आणि उद्योगधंद्यात विकास होतो. अशा भागात लोकसंख्या जास्त दस असते. उदा. भारतीय कि बिहार, झारखंड, प. बंगाल, जर्मनीतील फुर प्रदेश इ.

प्रतिकूल हवामानाचा लोकसंख्येवर परिणाम होतो. परंतु अशा प्रदेशात खनिजे सापडत असली व त्यांचे उत्खनन होत असेल तर तेथे लोकवस्ती होते. उदा - ऑस्ट्रेलियात सोने व अरेबियात खनिज तेल सापडते. प्रत्यक्षात येथील हवामान उष्ण व कोरडे आहे, पण येथे खाणकामामुळे लोकसंख्या जास्त आढळते.

क) नैसर्गिक वनस्पती (जंगले) :

जंगलाने व्यापलेल्या प्रदेशात मानवी वस्त्या नसतात ज्या असतात त्या अत्यंत विरळ असतात. त्यामुळे जंगलव्याप्त प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी असते. परंतु मानवी जीवनात जंगलांना महत्त्व आहे. जंगलावर लाकुड कटाई फर्निचर लगदा, कागद इत्यादी उद्योग अवलंबून असतात. म्हणुन विशेषत: आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या जंगलात व त्या परिसरात थोडी वस्ती आढळते येथे लोकसंख्येची घनताही थोडी जास्त असते उदा. समशीतोष्ण जंगलाचे प्रदेश.

२) आर्थिक घटक :-

भौगोलिक घटकांप्रमाणे लोकसंख्येच्या वितरणावर आर्थिक घटकांचा परिणाम होतो. आर्थिक घटकांमध्ये वाहतुकीची साधने खनिजांचे उत्खनन औद्योगिक प्रगती, जलसिंचनाची साधने नागरीकरण हे घटक प्रमुख आहेत.

ब) वाहतुकीची साधने :-
कोणत्याही प्रदेशात किंवा देशात लोकसंख्येच्या वितरणात वाहतुकीच्या साधनांना महत्व असते यात पक्के रस्ते, लोहमार्ग व जलमार्ग यांचा समावेश होतो. वाहतुकीच्या मार्गाने एका भागातून दुसऱ्या भागात सुलभतेने जाता येते त्यामुळे लोकांना निरनिराळ्या ठिकाणी पोहचण्यात येते प्रवाशांच्या वाहतुकी बरोबर वाहतुकीच्या मार्गाने धान्य, कच्चा माल व खनिजांची वाहतुक होते. त्यामुळे शेती, उदयोगधंदे, व्यापार व पर्यटनाच्या विकासाला चालना मिळते.

य) खनिजे व ऊर्जा साधनांचे उत्खनन :
खनिजे व ऊर्जा साधने महत्वाची होत. मात्र केवळ खनिजे व ऊर्जा साधनांची उपलब्धता महत्वाची नसते जोपर्यंत ती भुगर्भात असतात तोपर्यंत ती नैसर्गिक संपत्ती साधने असतात. उत्खनन झाल्यावर त्यांचे आर्थिक घटकात रूपांतर होते म्हणून त्यांचे उत्खनन महत्वाचे असते. खनिजांच्या उत्खननाने बांधकाम व उदयोगधंद्याची प्रगती होते.

क) औद्योगिक विकास
जेथे निरनिराळ्या उद्योगांचा विकास होतो. तेथे मजुरांची गरज असते. अशा ठिकाणी रोजगार मिळतो त्यामुळे निरनिराळ्या भागातील लोक औद्योगिक क्षेत्रात जाऊन राहतात. त्यामुळे अशा भागात लोकसंख्येची घनता जास्त असते उदा. - पश्चिम बंगाल, बिहार, ग्रेटब्रिटनमधील मँचेस्टर क्षेत्र. जर्मनीतील रूर प्रदेश इ.

ड) जलसिंचनाची साधने :-
जलसिंचनाच्या साधनांत धरणे, कालवे तलाव प्रमुख आहेत. जेथे या साधनांची प्रगती होते. तेथे शेतीचा विकास होऊन अन्नधान्य व इतर

कृषिमालाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होऊ लागते. अशा प्रदेशात कृषिमालावर आधारित उद्योगांचा विकास होतो. भारतात पंजाब व हरियाणात सतलजचे खोरे, व इजिप्त मधील नाईल नदीच्या खोऱ्यात जलसिंचनाच्या सोईमुळे तेथे लोकसंख्या जास्त आहे.

२) नागरीकरण :-

शहरी ही वाहतुकीच्या मार्गाची केंद्रे असतात अशा ठिकाणी उद्योगधंदे व व्यापाराची प्रगती होते त्यामुळे लोकांना रोजगार मिळतो. शहरात शिक्षण, आरोग्य मनोरंजन व सोई असतात त्यामुळे लोक ग्रामीण भागातुन शहरात जाऊन राहतात. अशा प्रकारे शहराकडे लोकांचे स्थलांतर होऊ तेथिल लोकसंख्या वाढते. मुंबई, कोलकाता लंडन ई. लोकसंख्या जास्त आहेत.

३) धार्मिक, राजकीय व सामाजिक घटक :-

धार्मिक, राजकीय व सामाजिक घटकांचाही लोकसंख्येच्या वितरणावर कमी - अधिक परिणाम होतो. उदा. मुस्लिम समाजात एकापेक्षा जास्त विवाह करणे व हिंदू धर्मात लवकर लग्न करण्याची पद्धत यामुळे लोकसंख्या वाढते त्याचप्रमाणे धार्मिक महत्त्व प्राप्त झालेल्या हरिद्वार, मथुरा, काशी, तिरुपती यासारख्या ठिकाणी भिक्षुक व भाविक येऊन स्थायी होतात. त्यामुळे त्या ठिकाणाची लोकसंख्या वाढते. व सामाजिक बंधने, कुटुंबाच्या आकार आणि सामाजिक रूढी यांचाही लोकसंख्येवर परिणाम होतो.

सारांश :- अशा प्रकारे लोकसंख्येचे वितरण सगळीकडे सारखे आढळत नाही. यामध्ये विविधता आढळून येते. भौगोलिक, आर्थिक, सामाजिक आणि राजकीय प्रकारचे विविध घटक लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करत असतात.

Scanned with OKEN Scanner

Harshada Patil BA III

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

55152

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| Signature of Supervisor | |
|---|---|

Suppliment No. :

Roll No. :

Class :

Subject :

Test / Tutorial No. :

Div. :

## लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

प्रस्तावना :-

भूतलावर लोकसंख्येची विभागणी सारखी नाही. ती अत्यंत विषम स्वरूपाची आहे. सामान्यत: पृथ्वीवरील 50% भाग हा मानवविरहित आहे. त्यात 25% भाग हा सुपच्च विरळ लोकवस्तीचा तर 25% भाग हा अतिशय दाट वस्ती असलेला आहे. निरनिराळे खंड व देशांचा विचार करता लोकसंख्येचे वितरण असमान आहे. याचे कारण म्हणजे लोकसंख्येच्या वितरणावर निरनिराळ्या घटकांचा परिणाम झालेला आहे. ज्या प्रदेशात मानवी वस्तीस अनुकूल परिस्थिती असते अशा प्रदेशात दाट लोकसंख्या आढळते. याउलट ज्या प्रदेशात मानवी वस्तीला फारशी अनुकूल परिस्थिती नसते अशा प्रदेशात विरळ लोकवस्ती आढळते. लोकसंख्येचे वितरण कोणत्याही एका घटकामुळे होत नसते.

◉ लोकसंख्या वितरणावर परिणाम करणारे घटक -

अ] प्राकृतिक घटक

१] प्राकृतिक रचना किंवा भूरूपे : सपाट प्रदेश शेतील अत्यंत उपयुक्त ठरतो. तेथे शेतीसाठी कालवे काढणे, रस्ते तयार करणे, लोहमार्ग

बांधणे अशी कामे करणे सोपे जाते; म्हणून सपाट मैदानी प्रदेशामध्ये शेती व कारखाने विकसित होतात. त्यामुळे सपाट मैदानी प्रदेशात दाट लोकवस्ती असते. उदा. नाईल, मिसिसिपी
थोडक्यात, प्राकृतिक रचनेचा विचार करता, सपाट मैदानी प्रदेशात लोकसंख्या जास्त, तर तीव्र उताराच्या डोंगराळ पर्वतीय प्रदेशात लोकसंख्या कमी आढळते.

2] हवामान :- हवामानाचा परिणाम विशेषकरून लोकसंख्येच्या घनतेवर होतो. अतिशय प्रतिकूल हवामान असलेले अतिउष्ण, अतिथंड, अति पावसाचे किंवा अति कोरड्या प्रदेशात लोकसंख्या विरळ असते. कारण असे प्रदेश लोकवस्तीस अनुकूल नसतात. उदा. सैबेरिया, अंटार्क्टिका यांसारख्या अतिथंड हवामान असलेल्या प्रदेशात लोकवस्ती आढळत नाही. सहारा, कलहारी यांसारख्या कोरड्या आणि अतिउष्ण वाळवंटी प्रदेशातही विरळ लोकवस्ती आढळते. याउलट जेथे ऋतुमानाप्रमाणे हवामान फारसे बदलत नाही अशा सम उबदार हवामान असलेल्या समशीतोष्ण प्रदेशात, तसेच मान्सून हवामानाच्या प्रदेशात दाट लोकवस्ती आढळते.

3] पाण्याची उपलब्धता :- मानवी वसाहत निर्माण होण्यासाठी अत्यंत आवश्यक असलेला घटक म्हणजे पाणी होय. मानव, प्राणी व वनस्पती हे पाण्यावाचून जगू शकत नाही. थोडक्यात, जेथे पुरेसा व नियमित पाणीपुरवठा असतो अशा प्रदेशात दाटलोकवस्ती असते. नद्यांची खोरे तसेच किनारपट्टी प्रदेश नद्यांचा मैदानी प्रदेश येथे दाट लोकवस्ती आढळून येते. भारतीय गंगा, यमुना नदीचा प्रदेश किंवा हिरवळीच्या प्रदेशात जेथे पाणी उपलब्ध असते तेथे लोकसंख्या केंद्रित झालेली आढळून येते.

4] मृदा :- मानवाची अन्नाची प्राथमिक गरज ही प्रामुख्याने शेती उत्पादनातून भागवली जाते आणि शेती ही मुख्यत: मृदेच्या सुपीकतेवर अवलंबून असते. नदयांच्या खोऱ्यातील गाळाच्या सुपीक जमिनीत शेती चांगली होते. म्हणूनच ईजिप्तमधील नाईल, भारतातील गंगा, यमुना तसेच मिसीसिपी या नद्यांची पुरमैदाने येथे लोकसंख्या अतिशय दाटीने केंद्रित झालेली आढळून येते. याशिवाय रेगुर किंवा काळी मृदा असलेले प्रदेश तसेच अग्निजन्य खडकापासून तयार झालेल्या मृदेत संपन्न शेती होते; म्हणून

तेथे लोकसंख्या केंद्रित झालेली दिसून येते.

नैसर्गिक वने :- अतिदाट वनांच्या प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी असते. विषुववृत्तीय वने अतिशय दाट असल्यामुळे तेथे अत्यंत विरळ लोकवस्ती आढळते उदा. ॲमेझॉनचे खोरे, कांगो नदीचे खोरे

प्रदेशाची सुगमता :- ज्या प्रदेशात माणसाला सहजासहजी ये-जा करणे शक्य असते अशा सपाट मैदानी व किनारपट्टीच्या प्रदेशात लोकसंख्या अधिक असते. याउलट ज्या प्रदेशात ये-जा करणे कठिण असते अशा डोंगराळ व दुर्गम प्रदेशात लोकवस्ती कमी असते.

] प्रदेशाचे सापेक्ष स्थान :- लोकसंख्या वितरणावर त्या क्षेत्राचे किंवा प्रदेशाचे सापेक्ष स्थान हा घटकही महत्त्वाचा ठरतो. काही प्रदेश बेटांवर असतात, काही प्रदेशांना द्वीपकल्पीय स्थान असते, तर काही देश हे पूर्णतः खंडांतर्गत असतात. याचाही परिणाम लोकसंख्येच्या वितरणावर होतो. बेटांच्या स्थानामुळे आंतरराष्ट्रीय संगीत प्राप्त होते. साहजिकच तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण आढळते उदा. इंग्लंड, जपान.

४] खनिजसंपत्ती किंवा भूगर्भ रचना :- पृथ्वीच्या भूकवचामधील खडकात मानवाला उपयोगी अशी अनेक खनिजे सापडतात. ही खनिजे मिळवण्यासाठी खाणींच्या जवळपास लोकवस्ती आढळून येते. जगाच्या काही भागात अन्य भौगोलिक घटक प्रतिकूल असूनही केवळ खनिज संपत्तीमुळे तेथे लोकसंख्येचे केंद्रीकरण झालेले दिसते.

ब] आर्थिक घटक

१] शेती :- खत व जलसिंचन यांचा वापर केल्याने शेतीच्या उत्पादनात वाढ होते. त्यावर अधिक लोकसंख्या पोसली जाऊ शकते. शेतीचे प्रकार, पीक पद्धत, लागवडीची पद्धत आणि वैशिष्टपूर्ण लोकसंख्या वितरणावर परिणाम होत असतो.

२] खाणकाम:- चांगल्या प्रतीच्या खनिजांची उपलब्धता असलेल्या क्षेत्रामध्ये उद्योग केंद्रित होतात. खाणकाम आणि उद्योग या व्यवसायांमुळे या प्रदेशात रोजगार निर्मिती होते. अशा उदयोगांना लागणाऱ्या कुशल अकुशल कामगारांच्या वस्त्या अशा परिसरात वाढतात, असे प्रदेश दाट लोकसंख्येचे बनतात. काही खनिजांचे मूल्य एवढे जास्त असते की, विषम नैसर्गिक परिस्थिती असताना देखील अशा प्रदेशांत खनिजांचे उत्पादन घेतले जाते. उदा. ऑस्ट्रेलियातील वाळवंटी प्रदेशातील सोन्याच्या खाणीचा प्रदेश.

३] वाहतूक :- वाहतूक आणि महामार्गांमुळेही अशा प्रदेशांमध्ये जाण्या-येण्यास सुलभता असते, त्यामुळे लोकसंख्येची घनता वाढते. याउलट जर जाण्या-येण्यास कष्ट, वेळ व पैसा अधिक लागत असेल तर अशा प्रदेशांत लोकसंख्येची घनता कमी असते. सागरी वाहतुकीमुळे नवनवीन भूमींचा शोध लागला. बंदरांचा विकास होऊन व्यापारास चालना मिळाली. तिथे लोकसंख्या वाढली. सुवेझ कालव्याच्या बांधकामामुळे कच्चा मालाची आणि उत्पादित वस्तूंची देवाण-घेवाण किफायतशीर झाली. सागरी वाहतुकीमुळे किनारी प्रदेशांत लोकसंख्या एकवटलेली दिसते. भारताचे पूर्व आणि पश्चिमी किनारी प्रदेश तसेच अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांचा पूर्व आणि पश्चिम किनारी प्रदेश ही याची उदाहरणे आहेत.

४] नागरीकरण :- उद्योगधंद्यांच्या विकासामुळे छोटी मोठी शहरे विकसित होतात. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा भागवण्यासाठी वाहतूक वाहतूक, व्यापार व इतर सेवा देणाऱ्या तृतीयक व्यवसायांमध्ये वाढ होते. नगरांमध्ये असणाऱ्या रोजगाराच्या संधी, चांगली वाहतूक व्यवस्था, शिक्षण व आरोग्याच्या दर्जेदार सोयी यांमुळे जगातील अनेक प्रदेशांत नागरी वस्त्यांचे सलग पट्टे आढळतात उदा. बृहन्मुंबई.

Scanned with OKEN Scanner

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

55154

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| Signature of Supervisor | |
|---|---|

Suppliment No. :

Roll No. :

Class :

Subject :

Test / Tutorial No. :

Div. :

5) राजकीय घटक व शासकीय धोरणे :- वरील सर्वघटकांशिवाय शासनाच्या विविध धोरणांचा परिणाम लोकसंख्येचे वितरण व घनतेवर होतो. शासनाच्या धोरणामुळे एखाद्या प्रदेशात लोकसंख्येचे केंद्रीकरण किंवा विकेंद्रीकरण होऊ शकते. उदा. सैबेरिया या अतिविषम हवामानाच्या प्रदेशात स्थलांतरित होणाऱ्या नागरिकांना शासनाने विशेष भत्ते व इतर जीवनावश्यक सुविधा देऊ केल्याने रशियाच्या या भागात आता लोकसंख्येचे स्थलांतर होताना दिसते. जपानच्या लोकसंख्येपैकी एक तृतीयांश लोक त्या देशातील टोकिओ शहरात राहतात. त्यामुळे तेथील सरकार लोकांना टोकिओ सोडण्यासाठी प्रोत्साहन स्वरूप पैसे देऊ करत आहे.

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

54607

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Signature of Supervisor | |

Name :- Rudra Shekhar Prabhavale
Suppliment No. :
Subject : लोकसंख्या भूगोल
Roll No. :
Test / Tutorial No. : [Population Geography].
Class : B.A. III.
Div. :

प्र. लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक.

प्रस्तावना :-

भूतलावर लोकसंख्येची विभागणी सर्वत्र सारखी नाही. ती मानवविरहीत स्वावी आहे. सामान्यत: पृथ्वीचा 50% भाग हा माणसाने व्यापला आहे. त्यामध्ये ~~25~~ 25% भाग हा खूपच विरळ लोकवस्तीचा तर 25% हा खूपच दाट वस्तीचा आहे. वेगवेगळ्या देशाचा विचार केल्यास लोकसंख्या ही एकसारखी आढळून येत नाही. या प्रमाणेच लोकसंख्येचे प्रमाण हे असमान आहे. जेथे लोकसंख्या अनुकूल आहे तेथे लोकसंख्या अधिक आणि जिथे लोकसंख्या परिस्थीती प्रतिकूल तेथे लोकसंख्या कमी.

* लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारे घटक :-

लोकसंख्या वितरणावर भौगोलिक, आर्थिक, धार्मिक सामाजिक तसेच राजकिय घटकाचा परिणाम होतो.

• भौगोलिक घटक [प्राकृतिक घटक]

कोणत्याहि प्रदेशातील लोकसंख्येच्या वितरणावर भौगोलिक घटकाचा परिणाम होतो उदा. पाणी पुरवठा, जमीन, हवा-

Scanned with OKEN Scanner

हवामान, भूरचना व खनिजसंपती या भौगोलीक घटकांचा समावेश होतो.

२]. भूरचना :-

भूरचनेचा लोकसंख्येच्या वितरणावर मोठा परिणाम होतो. पृथ्वीची भूरचना सर्वत्र एकसारखी अथवा समान नाहि. पृथ्वीचा काहि भाग पठारी काहि पर्वती तर काहि भाग मैदानी आहे. यांच्या भू-भागावर वेगवेगळ्या पद्धतिने परीनाम होतो. व झालेला आहे.

i] पर्वत :-

पर्वतीय प्रदेशाची भूरचना अतिशय ओबडधोबड असते. येथील जास्त उंची, तीव्र उताराचे भाग, खडकाळ जमीन जंगले व प्रदेशाची दुर्गमता यामुळे पर्वतीय प्रदेशात शेती, उद्योगधंदे व वाहतुकीचा विकास झालेला नसतो. याच कारणा मूळे पर्वतीय प्रदेशात लोकसंख्या कमी असते. उदा. हिमालय, रॉकी, अँडीज इ.

पर्वतीय प्रदेश माणवास वस्तीसाठी प्रतिकूल असेल तरी काहि पर्वतीय प्रदेशात माणवी वस्ती आढळते. आशा पर्वतीय प्रदेशात खनिजे सापडत असल्याने येथे योग्य आर्थिक विकास झालेला आहे. उदा- भारतामधील आसामच्या पर्वतावर खनिजतेल, तर उत्तर अमेरिकेतील अॅप्लेशियन पर्वतीय प्रदेशात दगडी कोळसा सापडतो.

ii] पठार :-

पठारि प्रदेश देखील माणव जीवनास अनुकुल नसतात पठारि प्रदेश दुर्गम असतात. या भागाचा इतर भागाशी जास्त संबंध्य नसतो. म्हणून त्या ठिकानी लोकसंख्या कमी असते. उदा. तीबेटचे पठार;

मात्र काहि पठारावरील सुपीक जमीनिमुळे तेथे

॥ ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार ॥
– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha Kolhapur's

54606

# VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)

**SUPPLIMENT**

| | |
|---|---|
| Signature of Supervisor | |
| Suppliment No. : | Subject : |
| Roll No. : | Test / Tutorial No. : |
| Class : | Div. : |


शेती व उद्योगधंद्याचा विकास झालेला आहे. उदा. भारताचे दख्खन चे पठार व अमेरिकेतील कोलंबियाचे पठार काही पठारावर खनिजे सापडतात अशा पठारी भागात आर्थिक विकास झालेला आहे.

उदा. दक्षिण अफ्रिकेच्या पठारावर लोक वस्ती आढळते.

मैदाने :-

iii] पर्वतीय व पठारी प्रदेशाच्या मानाने मैदानी प्रदेशात लोकसंख्या जास्त प्रमाणात आढळते. मैदानी प्रदेशात सुपीक जमीनीमुळे अन्न-धान्याचे व इतर कृषी मालाचे उत्पादन होते. कृषी च्या कच्च्या मालामुळे मैदानी प्रदेशात उद्योगधंद्या चा विकास होतो. सपाट प्रदेशामुळे येथे पक्के रस्ते व रेल्वे मार्गासारखी प्रगती होते. व त्याच मुळे व्यापाराची प्रगती होते. उदा. उत्तर भारताचे मैदान, संयुक्त संस्थाना मधील किनारवर्ती मैदाने. मैदानी प्रदेशाचे महत्त्व पाहता प्राचीन संस्कृतीच्या मैदानी प्रदेशात विकास झालेला आढळतो उदा. भारतीय, चीन, इजिप्शीयन संस्कृत्या. परंतु काही मैदाने लोकवस्ती प्रतीकूल असल्याने येथे अत्यंत कमी लोकसंख्या आढळून येते. उदा. सहारा व टुंड्राची मैदाने. सहारा मध्ये भयंकर तापमान व पाण्याच्या दुर्भिक्ष आणि टुंड्रा येथे अतिशय थंड हवामान

iv] समुद्र किनारे :-

समुद्र किनाऱ्याला मानवी दृष्ट्या खूप महत्त्व आहे. किनाऱ्याजवळ थोडी शेती होते तेथे भात व नारळाचे उत्पादन होते. किनाऱ्याजवळ मासेमारी चालते. शिवाय किनारा दंतुर असल्यास तेथे बंदराचा विकास होतो व व्यापाराची प्रगती होते. किनाऱ्याचे महत्त्व पाहता जगातील सर्वात मोठे शहरे हि किनाऱ्या वर स्थापन झालेली आहेत. त्यामुळे किनाऱ्यावर लोकसंख्येची घनता जास्त आढळते.

v] प्रदेशाची ऊंची :-

प्रदेशाच्या उंचीचासुद्धा देखील लोकसंख्येवर प्रभाव पडतो. कमी उंचीच्या प्रदेशात माणवास हवामान हे अनुकूल असते. त्यामुळे मैदानी लो प्रदेशात लोकवस्ती जास्त असते. येथे लोकसंख्येची घनता जास्त आढळते. याउलट जास्त उंचीच्या भागात थंड हवेमुळे लोकवस्ती विरळ असते. अतिउंचीच्याभागात तर मानवी वस्त्या नसतात. प्रतिकूल हवामानविशेषत येथे प्राणवायु अतिशय विरळ असतो. याचा ही परिणाम लोकवस्तीवर होतो. म्हणून हिमालय व जगातील इतर पर्वतीय क्षेत्रांत जास्त उंचीवर वस्ती आढळत नाही.

vi] पाणीपुरवठा :-

पाण्याचा लोकसंख्येच्या विभागणीवर फार मोठा परिनाम होतो. मानवी जीवनात पाण्याला अंत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. माणसांना केवळ पीण्यासाठीच पाणी लागते असे नसून त्याला शेती, उद्योगधंदे इ. साठीही पाणी हे लागते. त्यामुळे मनुष्य पाणी असलेल्या ठिकाणीच वस्ती करुण राहतो. नद्यांच्या माध्यमातून पाण्याचा मोठ्या प्रमानात पुरवठा होतो. म्हणून नद्याच्या खोऱ्यात दाट लोकवस्ती आढळते.

पाण्याच्या उपलब्धतेचा परिणाम कोरड्या हवामानाच्या प्रदेशात स्पष्टपणे दिसून येतो. शुष्क प्रदेशात पाण्याचे दुर्भिक्ष्य असते त्यामध्ये शुष्क प्रदेशात लोकसंख्या ही कमी असते. शुष्क प्रदेशात जेथे पाणी उपलब्ध असते. अशा भागात थोडी लोकवस्ती आढळते.

उदा. इजिप्त मधील नाईल चे खोरे.

[3] हवामान :-

हवामानाचा लोकसंख्येच्या वितरणावर फार मोठा प्रभाव पडतो. जेथे आवश्यक तेवढेच तापमान आणि पुरेसा पाऊस पडतो अशा अनुकूल हवामानाच्या प्रदेशात लोकसंख्या जास्त असते. तेथे शेती, उद्योगधंदे, व्यापार, वाहतूक इ. मोठा विकास होतो त्यामुळे अशा प्रदेशात लोकसंख्येची घनता असते.

उदा. मोसमी, चीनसदृश्य, भूमध्यसागरी, व पश्चिम युरोपीयन हवामानाचे प्रदेश.

प्रतिकूल हवामानाच्या प्रदेशात मात्र लोकवस्ती ही कमी असते ~~उदा.~~ अशा भागात शेती, उद्योगधंदे, व्यापार ~~इत्य~~ इ. विकास होत नाही. येथे घनता अत्यंत कमी असते. उदा. मोसमी वाळवंटी, व टुंड्रा हवामानाचे प्रदेश. वाळवंटी प्रदेशात भयंकर तापमान व पाण्याची टंचाई यामुळे लोकसंख्या ही खूपच विरळ असते.

[5] मृदा :-

मृदा किंवा जमीन हा देखील लोकसंख्येच्या वितरणावर परिणाम करणारा मुख्य प्रभावी घटक आहे. जमिनीवर शेतीचे प्रगती अवलंबून असते जेथे सुपीक जमिन असते जेथे शेतीचा विकास होतो. अशा प्रदेशात अन्नधान्याचे व कृषी मालाचे मोठ्या प्रमाणात उत्पादन होते. नद्यांच्या खोऱ्यात गाळाची सुपीक जमिन असते. म्हणून नद्यांच्या खोऱ्यात शेती आणि शेतीमालावर आधारीत उद्योगाचा विकास होतो.

त्यामुळे नद्यांच्या खोऱ्यात लोकसंख्या ची घनता जास्त अ
उदा: गंगा, सिंधु, यॉंगत्सिकॅंग इ. नदीचे खोर

(5). खनिजे व ऊर्जा साधने :-

खनिजे व ऊर्जा साधने यांना खूप महत्व आहे. अशुद्ध लोखंड, मंगलधातू, बॉक्साईड, तांबे इ. महत्त्वाची खनिजे असून दगडी कोळसा, खनिजतेल हे महत्त्वाची ऊर्जा साधने आहेत. जेथे खनिज व ऊर्जा साधने विपुल प्रमाणात असतात. तेथे खानकाम व उद्योगांचा विकास होतो. अशा भागात लोकसंख्या जास्त असते. उदा. भारतातील बिहार, झारखंड, पं.बंगाल, जर्मनीतील रूर प्रदेश. इ. प्रदेशात निरनिराळी खनिजे सापडतात. यामुळे या प्रदेशात लोकसंख्येची घनता जास्त आहे.

प्रतिकूल हवामानाचा लोकसंख्येवर परिणाम होतो पण अशा प्रदेशात खनिजे सापडत असतील व व त्यांचे उत्खनन होत असेल तर तेथे लोकवस्ती होते. उदा. ऑस्ट्रेलियात सोने व अरेबियात खनिज तेल सापडते. प्रत्यक्षात येथील हवामान उष्ण व कोरडे आहे. पण तेथे खानकामामुळे लोकसंख्या जास्त आढळते.

(6). नैसर्गिक वनस्पती [जंगले] :-

जंगलानी व्यापलेल्या प्रदेशात मानवी वस्त्या नसतात. ज्या असतात त्या अत्यंत विरळ असतात. त्यामुळे जंगल व्याप्त प्रदेशात लोकसंख्येची घनता कमी असते. परंतु मानवी जीवनात जंगलांना महत्त्व आहे. जंगलांवर लाकूड कटाई, फर्निचर, लगदा, कागद इत्यादी उद्योग अवलंबून असतात. म्हणून आर्थिकदृष्ट्या महत्त्वाच्या जंगलात थोडी वस्ती आढळते. येथे लोकसंख्येची घनता थोडी जास्त असते.

उदा. समशीतोष्ण जंगलांचे प्रदेश.

आर्थिक घटक :-

भौगोलीक घटका प्रमाणेच लोकसंख्येवर आर्थिक घटकाच्या देखील परिणाम होतो. आर्थिक घटकामध्ये वहतुकीची साधने. खनिजाचे उत्खनन. औद्योगिक प्रगती. जलसिंचनाचि साधने. नागरिकरण हे घटक प्रमुख आहेत.

अ] वहतुकिची साधने :-

कोणत्याही प्रदेशात किंवा देशात लोकसंख्येच्या वितरनात वाहतुकीच्या साधनांना महत्त्व असते यात पक्के रस्ते लोहमार्ग, जलमार्ग यांचा समावेश होतो. वहतुकीच्या मार्गामुळे एका भागावरुन दुसरीकडे सहजतेने जाता येते त्यामुळे लोकाना निरनिराळ्या ठिकाणी पोहचता येते. प्रवाशयाच्या वाहतुकी बरोबर वाहतुकीच्या मार्गाने धान्य, कच्चा माल, व खनिजाची वाहतुक होते त्यामुळे शेती, उद्योगधंदे, व्यापार व पर्यटन विकासाला चालना मिळते. वाहतुकीच्या साधनाच्या वापरा मुळे शहराची प्रगती होते.

ब]. खनिज व ऊर्जा साधनाची उत्खनन :-

खनिज व ऊर्जा साधने महत्त्वाची आहेत मात्र केवळ खनिज व ऊर्जा साधनाची उपलब्धता महत्त्वाची नसते जो पर्यंत ती भूगर्भात असतात. उत्खनन झाल्या पर त्याचे आर्थिक घटकात रुपातर होते. म्हणुन त्याचे उत्खनन महत्वाचे आहे. यामुळे खानकाम व उद्योगधद्यांची प्रगती होतेय.

क] औद्योगीक विकास :-

जेथे निरनिराळ्या उद्योगाच्या विकास होतो, तेथ मजुराची गरज असते. अशा ठिकानी रोजगार मिळतो म्हणुन निरनिराळ्या भागात औद्योगीक क्षेत्रात लोक जाऊन राहतात त्यामुळे अशा भागात लोकांची घनताही जास्त असते.

उदा. पश्चिम बंगाल, बिहार, ग्रेटब्रिटन मधील मँचेस्टर जर्मनितील रूर प्रदेश, इ. क्षेत्रात औद्योगीक विकास झाल्यामुळे तेथे लोकसख्या अधिक आहे.

Scanned with OKEN Scanner

७] नागरिकीकरण :-
शहरे हि वाहतुकीच्या मार्गाची केंद्रे असतात. अशा ठिकानी व्यापार व उद्योगधंदयान्ची प्रगती होते. त्यामुळे लोकाना रोजगार मिळतो. शहरात शिक्षण, आरोग्य मनोरंज व सोई असतात. त्यामुळे लोक ग्रमिण भागातुन शहरी भागात राहतात. अशा प्रकारे लोकाचे शहराकडे स्थलातर होऊ लागले आहे. म्हणून शहरे वाढु शकतात. त्यामुळे नागरीकरन होऊन. तेथील लोकसंख्या वाढते. मुंबई, कोलकाता, शांघाय, लंडन, हे शहरात व त्याच्या परीसरात लोकसंख्या जास्त असण्याची कारणे म्हणजे नागरीकीकरण.

८] धार्मिक राजकिय व सामाजिक घटक :-
धार्मिक, राजकिय व सामाजिक घटकाच्या देखील लोकसंख्येच्या वितरणावर कमी जास्त परिणाम होतो. उदा. मुस्लिम समाजात एकापेक्षा जास्त विवाह करणे व हिंदु धर्मात लवकर लग्न करण्याची पद्धत यांनमुळे लोकसंख्या वाढते. काही वेळा राजकिय घटकाचा लोकसंख्येवर परिणाम होतो. उदा - दुसऱ्या महायुद्धात अनेक लोक मरले गेल्याने इटली जर्मनी देशाला, सरकारने लोकसंख्येच्या वाढीस प्रोत्साहन दिले. सामाजिक बंधने कुटुंबाचा आकार आणि सामाजिक रूढी, यांचाही लोकसंख्येवर परिणाम होतो.

० सारांश :-
अशा प्रकारे लोकसंख्येचे वितरण नगळीकडे सारखे आढळत नाही. यामध्ये विविधता आढळुन येते. भौगोलिक आर्थिक सामाजिक आणि राजकिय प्रकाराचे विविध्य घटक लोकसंख्येच्या वितरणावर परिनाम करत असतात.

Scanned with OKEN Scanner